**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**जल अभियंता विभाग**

परिपत्रक

क्रमांक जअ/ ०३ /परिपत्रक दि.२८.०६.२०२२

विषय:- सर्व निवासी जागांना पाणी पुरवठा करणेबाबतचे धोरण.

संदर्भ:- १) MGC/F/6867 दि.12.05.2022.

२) मस/२०३०/एसआर / प्रशासक (स्था.स.) दि.०८.०६.२०२२

३) क्र. मस/३५६४/एसआर / प्रशासक (मनपा) दि.२७.०६.२०२२.

वरील विषयासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व निवासी जागांना पाणीपुरवठा करणेबाबत 'सर्वांसाठी पाणी' हे धोरण जाहिर केले आहे. सदर धोरणास मा. आयुक्तांनी क्र.MGC/F/6867 दि.12.05.2022 अन्वये, मा. प्रशासक, (स्थायी समिती) यांनी क्र. मस/२०३०/एसआर / प्रशासक (स्था.स.) दि.०८.०६.२०२२ अन्वये व मा. प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी क्र. मस/३५६४/एसआर / प्रशासक (मनपा) दि.२७.०६.२०२२ अन्वये मंजुरी दिली आहे. सदर धोरण खालील प्रमाणे आहे.

**सर्व निवासी रहिवाश्यांना पाणी पुरवठ्यासाठी धोरण**

1) सध्याच्या धोरणानुसार स्थायी समितीने मंजूर केलेल्या ठराव क्र. OD/MTC/6454 दि. 22.06.2016 व सभागृहाने मंजूर केलेल्या ठराव क्र. OD/MTC/5556 दि. 02.12.2016 नुसार खाली नमूद केलेल्या झोपडपट्ट्यांना पाणी दिले जात नाही.

अ. फूटपाथ आणि रस्त्यांवर असलेल्या झोपडपट्ट्या.

ब. खाजगी जमिनीवरील अघोषित झोपडपट्ट्या.

क. समुद्र किनाऱ्यावर असलेल्या परंतु गावठाण व भूवापर सर्वेक्षणात समाविष्ट नसलेल्या झोपडपट्ट्या. तसेच सार्वजनिक वापरासाठी विकसीत करावयाच्या जमिनीवरील / मालमत्तेवरील अस्तित्वात असलेल्या झोपड्या.

ड. प्रकल्पांमुळे बाधित झोपड्या (उदा. पर्जन्य जलवाहिन्या, रस्ते, जलवाहिनी इ. साठी). ज्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका / कोणत्याही सरकारी संस्थेने प्रकल्पाचे नियोजन सुरू केले आहे.

इ. माननीय न्यायालयाच्या आदेशान्वये ज्या भागात पाणीपुरवठा करण्यास मनाई आहे त्या भागातील झोपड्या.

फ. 01.01.2000 नंतरच्या केंद्र सरकारच्या जमिनींवरील झोपडपट्ट्या जसे रेल्वे, बीपीटी, मिठागरे यांना संबंधित प्राधिकरणाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रासापेक्ष पाणी जोडणी दिली जाते.

तसेच अनधिकृत बिगर झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकाला पाण्याची जोडणी देणे नाकारले जात होते. तसेच, गावठाण आणि कोळीवाडा भागात दि.01.01.2000 नंतर निर्माण झालेल्या बांधकामांना पाणी जोडणी नाकारण्यात आली आहे.

2) दक्षिण आफ्रिकेसारख्या जगातील काही देशांनी पिण्याचे पाणी मिळण्याचा अधिकार हा मूलभूत हक्क केला आहे. 2030 मध्ये शाश्वत विकासाच्या विषयपत्रिकेत, सर्वांसाठी परवडणाऱ्या स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि कायमस्वरूपी व्यवस्थापन सुनिश्चित करणे हे सहावे शाश्वत विकास ध्येय (SDG) आहे. भारतीय संविधानातील कलम 21 हे जीवनाच्या अधिकाराची हमी देते. भारतीय संविधानानुसार संरक्षित जीविताच्या अधिकारामध्ये अन्नाचा अधिकार, आरोग्याचा अधिकार आणि स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार यांचा समावेश होतो. अन्नाचा अधिकार म्हणजेच सुरक्षित आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा हक्क, असा अन्वयार्थ मा. उच्च न्यायालयांनी दिलेल्या अनेक निर्णयांतर्गत लावता येतो.

तथापि, असे निदर्शनास आले की, सध्याच्या धोरणामध्ये, काही झोपडपट्टी रहिवासी/ रहिवासी/ लोकांच्या गटांना वगळण्यात आले असल्याने जल जोडणी नाकारण्यात आली आहे. या निर्बंधांमुळे गरीबांवर आणि विशेषत: स्त्रियांवर भार पडतो ज्यात बदल होणे आवश्यक आहे.

वरील बाबी लक्षात घेता, झोपडपट्ट्या, अनधिकृत बिगर झोपडपट्टी बांधकामे आणि गावठाण, कोळीवाड्यातील वगळलेल्या रहिवाशांना पाणी पुरवठा मंजूर करण्यासाठी एक सर्वसमावेशक धोरण विचारात घेण्यात आले आणि " सर्वांसाठी पाणी " असे धोरण तयार करण्यात आले आहे. हे धोरण अंमलात आल्यानंतर पूर्वीच्या धोरणांतर्गत जारी केलेले क्रमांक HE/06/परिपत्रक dt.10.01.2017 हे परिपत्रक रद्द होईल.

3) या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल:-

1. निवासस्थानांसाठी जलजोडणी, अस्तित्वात असलेल्या नियमांनुसार, पूर्वग्रह न ठेवता मंजूर केली जाईल.

2. सुधारित देण्यात आलेली जलजोडणी कोणत्याही प्राधिकरणाला अथवा विभागीय अधिकाऱ्यांना कोणत्याही कायद्यान्वये अनधिकृत बांधकामे पाडण्याच्या अधिकारापासून अडवू शकणार नाही.

3. बांधकाम पाडल्यानंतर / निष्कासित केल्यानंतर जलजोडणी खंडित होण्याच्या कारवाईस पात्र आहे.

4. आतापर्यंत नाकारलेल्या वर्गांना या धोरणांतर्गत देण्यात येणारी निवासी जल जोडणी ही पूर्णपणे मानवतावादी द्रुष्टिकोनावर आधारित मूलभूत सुविधा आहे. अशी जल जोडणी मंजूर केल्याने अर्जदाराला जमिनीच्या/ मालमत्तेच्या मालकीबाबत कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. सदर जलजोडणीची कागदपत्रे कोणत्याही मंच किंवा न्यायालयासमोर कोणत्याही मालमत्तेच्या शीर्षकाच्या मालकीचा दावा करण्यासाठी जलजोडणीसंदर्भातील कागदपत्रे समर्थनीय दस्तऐवज

म्हणून सादर केली जाऊ शकणार नाहीत. बेकायदेशीर संरचनेच्या अधिकृततेचा किंवा जमीन/मालमत्तेचा मालकी स्वीकारण्याचा पुरावा म्हणून वापरली जाणार नाहीत. अशी निवासी जल जोडणी दिल्यानंतर, कोणत्याही प्राधिकरणाला/ विभागाला वेगवेगळ्या कायद्यांनुसार आणि अधिकृत कायद्यांतर्गत अनधिकृत बांधकामे केव्हाही निष्कासित करण्याच्या कारवाईपासून प्रतिबंधित करत नाही. सर्व अर्जदारांना जल अभियंता विभागाला हमीपत्र द्यावे लागेल की ते या कलमाशी सहमत आहेत आणि भविष्यात ते या कलमाचे पालन करतील.

5. सदर जलजोडणी, प्रचलित जल आकार नियमामावली 2015 आणि नंतर वेळोवेळी सुधारीत केलेल्या यथायोग्य दराने आकारले जातील.

6. अर्जदारास खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र निवासी पुरावा म्हणून सादर करावे लागेल: विजेचे देयक /महानगर गॅस देयक/आधार कार्ड/निवडणूक ओळखपत्र/ पारपत्र/ वाहनचालक परवाना/ शिधापत्रिका/ बँक पास बुक / जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेला फोटो पास.

7. अर्जदारास खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र ओळखीचा पुरावा म्हणून सादर करावे लागेल:
आधार कार्ड / निवडणूक ओळपत्र / पारपत्र / वाहनचालकाचा परवाना/ बँक पासबुक फोटोसहित / पोस्ट ऑफिस पासबुक फोटोसहित / पॅन कार्ड फोटोसहित.

8. कोणत्याही सी-१ श्रेणीतील जीर्ण इमारतीला / बांधकामांना जलजोडणी देण्यात येणार नाही.

9. या धोरणांतर्गत रस्ते आणि फूटपाथवर असलेल्या अनधिकृत बांधकामांना जलजोडणी दिली जाणार नाही.

10. जिथे अर्जदाराचे बांधकाम / झोपडीच्या जवळपास पाणी वितरण जाळे उपलब्ध नाही अशा ठिकाणी संबंधित सहाय्यक अभियंता (जलकामे) सदर जागेची तपासणी करून तेथे पाणी वितरण जाळे टाकण्याचे प्रस्ताव तयार करतील. यादरम्यान, अर्जदाराने उपलब्ध पाणी वितरण जाळ्यातून व उपलब्ध असलेल्या पाणीदाबात पाणीपुरवठ्याचा लाभ घेण्यास संमती दिल्यास सहाय्यक अभियंता (जलकामे) अर्जदारासह सदर जागेची तपासणी करून अर्जदारास उपलब्ध पाणी वितरण जाळे व पाण्याचा पुरेसा दाब असलेल्या स्थळाबाबत अर्जदारास माहिती करून देतील. अर्जदारास सदर ठिकाणी स्वखर्चाने सार्वजनिक मोरी बांधावी लागेल. भविष्यात योग्य पाणी वितरण जाळे उपलब्ध झाल्यानंतर अर्जदाराची इच्छा असल्यास अर्जदाराच्या खर्चाने पाणी जोडणी स्थलांतरित केली जाईल. तथापि, अशा ठिकाणी जल जोडणी घेण्यास अर्जदारांनी संमती न दिल्यास त्यांच्या अर्जांवर पाणी वितरणाचे जाळे टाकल्यानंतर विचार केला जाईल.

11. या धोरणांतर्गत मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 92 अन्वये पाण्याची जोडणी मंजूर केली जाईल व ते प्रचलित जल आकार नियमावली, जल उपविधी इ. यांतील तरतुदींअधीन राहून असेल.

12. कोणतीही जलजोडणी देताना, करनिर्धारण व संकलन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही.

**4) " सर्वांसाठी पाणी " धोरणांतर्गत खालील निवासी श्रेणींकरिता आहे:**

अ. झोपडपट्टीतील रहिवाशांसाठी
ब. अनधिकृत बिगर झोपडपट्टी निवासी बांधकामासाठी

क. गावठाण आणि कोळीवाड्यातील निवासी बांधकामे

ड. इतर

**4.अ) झोपडपट्टी क्षेत्रातील पाणी पुरवठा नियमन करणाऱ्या अटी -**

1. अनधिकृत झोपड्या आणि बांधकामांना उभ्या जलजोडणीद्वारे पाणीपुरवठा नियामक अटींनुसार देण्यात येईल.

2. झोपडपट्टी रहिवाश्यांच्या समूहाला, मात्र 15 झोपडपट्ट्याहून कमी नाही अशांना प्राधान्याने उभ्या नळ जोडण्या देण्यात येतील.

3. झोपडपट्टी रहिवाशांनी मंडळ स्थापन करुन, त्यांच्यापैकी जल जोडणीच्या उचित देखभालीस आणि/ संबंधित आकाराच्या नियमीत अधिदानास जबाबदार अशा कमीत कमी एका अधिकृत प्रतिनिधीस नाम निर्देशित केले तरच अशा जोडण्या देण्यात येतील.

4. महानगरपालिका आयुक्त वा त्यांनी या बाबतीत अशा प्रकारे अधिकार दिलेला कोणताही अधिकारी अशी जोडणी, संख्येने 15 पेक्षा कमी रहिवाश्यांच्या मंडळास (परंतु 5 पेक्षा कमी नाही) देईल, मात्र ते अशा जोडणीची गरज, आवश्यक त्या जबाबदाऱ्या स्विकारण्याची मंडळाची तयारी आणि पाणी पुरवठ्याची उपलब्धता यांवर अवलंबून राहिल.

5. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(6) मध्ये नमूद केल्यानुसार निवासी पुरावा सादर करण्यात यावा.

6. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(7) मध्ये नमूद केल्यानुसार ओळखीचा पुरावा सादर करण्यात यावा.

7. दि.01.01.2000 पूर्वी अस्तित्वात आलेल्या झोपडपट्टी तसेच आदिवासी पाड्यातील निवासी जलजोडण्या यांना जल आकार नियमावलीतील नियम क्र. 1.01-2 अनुसार पाणी पुरवठा करण्यात येईल. परंतु, दि.01.01.2000 नंतर अस्तित्वात आलेली झोपडपट्टी व आदिवासी पाडे यांना जल आकार नियमावलीतील नियम क्र. 1.1 अनुसार पाणीपुरवठा करण्यात येईल. सदर दर वेळोवेळी सुधारण्यात येतील.

8. वरील खंड 1 खाली उभी नळ जोडणी देणे याचा अन्वयार्थ अशी बांधकामे नियमीत करण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी आहे असा होणार नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, जल उपविधी किंवा कायदेशीर बाबी यांना बाधा न आणू देता अशा जोडण्या देण्यात येतील.

9. अशा जोडण्या, त्यांची योग्य प्रकारे देखभाल करण्यात, महानगरपालिकेची देणी देण्यात वा महानगरपालिकेच्या मागणीची पूर्तता करण्यात कुचराई केल्यास खंडीत करण्यात येतील.

10. या धोरणांतर्गत जलजोडणी घेताना समुहाच्या खर्चाने मल:निसारण व्यवस्था गरज असल्यास शोषखड्ड्यासह करणे बंधनकारक राहील.

11. झोपडीधारकांकडून असे शपथपत्र घेतले जाईल की, योग्य मल:निसारण व्यवस्था केली आहे आणि भविष्यात जर काही आरोग्यास अपायकारक परिस्थिती उद्भवली तर झोपडीधारक सदर सुविधा दुरुस्त करतील व संबंधित प्राधिकरणाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतील.

12. ज्या ठिकाणी पाणीपुरवठ्याचा दाब जलजोडणीच्या विस्तारास अनुमती देण्यास पुरेसा आहे अशा ठिकाणी समुहातील प्रत्येक सभासद जोडणी विस्तारासाठी लेखी अर्ज करु शकेल. परंतु ज्या ठिकाणी पाणी पुरवठ्याचा दाब पुरेसा नसेल अशा ठिकाणी जोडणी, समुहातील व्यक्तीगत झोपडपट्ट्यांना विस्तारीत करता येणार नाही.

13. समुहातील व्यक्तीगत झोपडपट्टीच्या किंवा संयुक्त उभ्या नळजोडणीच्या विस्ताराच्या प्रकरणी प्रत्येक जोडणी सभासद जोडणीच्या उचित देखभालीस आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित सर्व आकाराच्या अधिदानास जबाबदार असेल.

14. जर कोणत्याही झोपडीत पोटमाळे, मेझानाईन फ्लोअर्स, वरचे मजले इत्यादी असतील, तरीही जलजोडणी देण्यासाठी व पाण्याची गरज इ. करिता सदर झोपडी एकच झोपडी म्हणूनच गणली जाईल.

15. खाजगी जमिनीवरील अघोषित झोपडपट्ट्यांना रहिवाशांकडून हमीपत्र घेऊन सार्वजनिक मोरीमध्ये जलजोडणी उपलब्ध करून दिली जाईल.

16. तटीय नियमन क्षेत्रात (CRZ) भागात समुद्रकिनारी असलेल्या झोपड्यांना सार्वजनिक मोरीमध्ये जलजोडणी उपलब्ध करून दिली जाईल.

17. कोणत्याही शासकीय / महानगरपालिकेच्या प्रकल्पबाधित झोपड्यांना सार्वजनिक मोरीत पाणीपुरवठा तोपर्यंत उपलब्ध करून दिला जाईल, जोपर्यंत झोपड्या संबंधित प्राधिकरणाकडून त्या निष्कासीत केल्या जात नाहीत.

18. केंद्र सरकार/रेल्वे/विमानतळ प्राधिकरण/बीपीटी/जंगल आणि खारफुटी इत्यादींच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासीयांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर, संबंधित सहाय्यक अभियंता (जलकामे) द्वारे संबंधित प्राधिकरणाला सूचना जारी केली जाईल की जलजोडणीसाठी अर्ज प्राप्त झाला आहे आणि तो विचाराधीन आहे. सदर सूचना मिळाल्यापासून 3 आठवड्यांच्या आत आक्षेप प्राप्त न झाल्यास, संबंधित सहाय्यक अभियंता (जलकामे) द्वारे जलजोडणी सार्वजनिक मोरीमध्ये मंजूर केली जाईल. कोणताही आक्षेप प्राप्त झाल्यास, मुंबई महानगरपालिका कलम २७१ (२) अंतर्गत स्पष्ट केलेल्या प्रक्रियेचे पालन केले जाईल.

19. जंगल आणि खारफुटीच्या जमिनीवर वसलेल्या झोपड्यांना पाणीपुरवठा करणे हे विद्यमान कायदेशीर निर्बंध आणि सन्माननीय न्यायालयाच्या आदेशांच्या अधीन असेल.

## 4. ब) अनधिकृत बिगर झोपडपट्टी निवासी बांधकामासाठी धोरण:

### अ) क्षमापित (Tolerated) जलमापकयुक्त / जलमापक विरहीत बांधकामांमधील 16-04-1964 नंतर आलेली बांधकामे

दि.16.04.1964 नंतरच्या आलेल्या वाढीव भागामध्ये येणाऱ्या निवासी सदनिकांना मानकानुसार जलमापकयुक्त जलजोडणी साठवण टाकीमध्ये, (टाकी उपलब्ध नसल्यास अर्जदारास स्वखर्चाने बांधावी लागेल) खालील गोष्टींच्या अधीन राहून दिली जाईल:

1. मालमत्ता कर भरण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार असलेल्या मालक/संस्था /व्यक्तीच्या संमतीसह अर्ज.

2. महानगरपालिका मालमत्ता कर बिल/ मालमत्ता प्रपत्र. (करनिर्धारण व संकलन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक नाही)

3. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(6) मध्ये नमूद केल्यानुसार निवासी पुरावा सादर करण्यात यावा.

4. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(7) मध्ये नमूद केल्यानुसार ओळखीचा पुरावा सादर करण्यात यावा.

5. वरील बांधकामास प्रचलित नियमावली नियम क्र. 6.2.4 (2) नुसार, दुरेक्ष पध्दतीने जल आकार आकारण्यात येईल.

6. रहिवाशांनी मंडळ स्थापन करुन, त्यांच्यापैकी जल जोडणीच्या उचित देखभालीस आणि/ संबंधित आकाराच्या नियमीत अधिदानास जबाबदार अशा कमीत कमी एका अधिकृत प्रतिनिधीस नाम निर्देशित केले तरच अशा जोडण्या देण्यात येतील

7. जल अभियंता खाते आणि त्याचे अधिकारी बांधकामामुळे मालमत्तेचे/जीवनाचे होणारे नुकसान/त्यामुळे उद्भवणारे कोणतेही कायदेशीर खटले/विवाद, कोणत्याही कायद्याच्या न्यायालयात, कोणत्याही अपघात/अपघातासाठी जबाबदार राहणार नाहीत असे क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) अर्जदाराकडून घेण्यात येईल.

8. पाणी जोडणी दिल्यानंतर, पदनिर्देशित अधिकाऱ्याला कळवले जाईल की जलजोडणी दिली गेली आहे आणि बांधकाम निष्कासीत केल्यानंतर सदर जलजोडणी खंडित केली जाईल.

9. करनिर्धारण व संकलन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

10. अर्जदाराने सदर बांधकामाच्या क्षेत्राचे प्रमाणपत्र नोंदणीकृत वास्तुविशारद/ परवानाधारक सर्वेक्षकातर्फे, अतिरिक्त जल आकार / अतिरिक्त मलनि:सारण आकाराचे (EWC/ ESC) गणन करण्यासाठी, देणे आवश्यक असेल व त्यानुसार जलजोडणी देतेवेळेस असलेल्या प्रचलित नियमानुसार अतिरिक्त जल आकार / अतिरिक्त मलनि:सारण आकार (EWC/ ESC) किंवा अतिरिक्त मलनि:सारण आकार (ESC), अर्जदाराने भरणे आवश्यक असेल.

11. जेथे पाण्याच्या जमिनीलगत टाकीसाठी जागा उपलब्ध नाही अशा प्रकरणांमध्ये, जमिनीलगत टाकी म्हणून कार्य करू शकणाऱ्या इतर सुरक्षित साठवण सुविधांचा वापर केला जाऊ शकतो. केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्ये उभ्या जलजोडणीच्या परवानगीचा विचार केला जाऊ शकतो आणि उभ्या जलजोडणीसाठी सर्व शुल्कदेखील कोणतीही सवलत न घेता समान राहतील.

**ब) निवासी बांधकामे किंवा त्यांची अंशतः बांधकामे ज्यांचा बांधकामांचा नकाशा नामंजूर किंवा अंशतः मंजूर असून ज्यांना बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळाले नाही अशी (निवासी) बांधकामे -**

या बांधकामातील निवासी सदनिकांना मानकानुसार जलमापकयुक्त जलजोडणी साठवण टाकीमध्ये, (टाकी उपलब्ध नसल्यास अर्जदारास स्वखर्चाने बांधावी लागेल) खालील गोष्टींच्या अधीन राहून दिली जाईल:

1. महानगरपालिका मालमत्ता कर बिल/ मालमत्ता प्रपत्र. (करनिर्धारण व संकलन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक नाही)

2. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(6) मध्ये नमूद केल्यानुसार निवासी पुरावा सादर करण्यात यावा.

3. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(7) मध्ये नमूद केल्यानुसार ओळखीचा पुरावा सादर करण्यात यावा.

4. वरील बांधकामास प्रचलित नियमावली नियम क्र. 6.2.4 (2) नुसार, दुरेक्ष पध्दतीने जल आकार आकारण्यात येईल.

5. जल अभियंता खाते आणि त्याचे अधिकारी बांधकामामुळे मालमत्तेचे/जीवनाचे होणारे नुकसान/त्यामुळे उद्भवणारे कोणतेही कायदेशीर खटले/विवाद, कोणत्याही कायद्याच्या न्यायालयात, कोणत्याही अपघात/अपघातासाठी जबाबदार राहणार नाहीत असे क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) अर्जदाराकडून घेण्यात येईल.

6. पाणी जोडणी दिल्यानंतर, पदनिर्देशित अधिकाऱ्याला कळवले जाईल की जलजोडणी दिली गेली आहे आणि बांधकाम निष्कासीत केल्यानंतर सदर जलजोडणी खंडित केली जाईल.

7. करनिर्धारण व संकलन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

8. अर्जदाराने सदर बांधकामाच्या क्षेत्राचे प्रमाणपत्र नोंदणीकृत वास्तुविशारद/ परवानाधारक सर्वेक्षकातर्फे, अतिरिक्त जल आकार / अतिरिक्त मलनि:सारण आकाराचे (EWC/ ESC) गणन करण्यासाठी, देणे आवश्यक असेल व त्यानुसार जलजोडणी देतेवेळेस असलेल्या प्रचलित नियमानुसार अतिरिक्त जल आकार / अतिरिक्त मलनि:सारण आकार (EWC/ ESC) किंवा अतिरिक्त मलनि:सारण आकार (ESC), अर्जदाराने भरणे आवश्यक असेल.

9. जेथे पाण्याच्या जमिनीलगत टाकीसाठी जागा उपलब्ध नाही अशा प्रकरणांमध्ये, जमिनीलगत टाकी म्हणून कार्य करू शकणाऱ्या इतर सुरक्षित साठवण सुविधांचा वापर केला जाऊ शकतो. केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्ये उभ्या जलजोडणीच्या परवानगीचा विचार केला जाऊ शकतो आणि उभ्या जलजोडणीसाठी सर्व शुल्कदेखील कोणतीही सवलत न घेता समान राहतील.

**4. क) गावठाण आणि कोळीवाड्यातील निवासी बांधकामे –**

गावठाण आणि कोळीवाडा परिसरातील निवासी सदनिकांना मानकानुसार जलमापकयुक्त जलजोडणी जमिनीलगत टाकीमध्ये, (टाकी उपलब्ध नसल्यास अर्जदारास स्वखर्चाने बांधावी लागेल) दिली जाईल. सिमेंट काँक्रीट टाक्या / स्टील टाक्या आणि सिंटेक्स टाक्या यासारख्या इतर साठवण पर्यायांचाही विचार केला जाऊ शकतो.

वरील बांधकामातील निवासी सदनिकांना खालील गोष्टींच्या अधीन राहून जलजोडणी दिली जाईल:

1. मालमत्ता कर भरण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार असलेल्या मालक/संस्था /व्यक्तीच्या संमतीसह अर्ज.

2. महानगरपालिका मालमत्ता कर बिल/ मालमत्ता प्रपत्र. (करनिर्धारण व संकलन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक नाही)

3. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(6) मध्ये नमूद केल्यानुसार निवासी पुरावा सादर करण्यात यावा.

4. 'या धोरणांतर्गत खालील आधारांवर जलजोडणी दिली जाईल' च्या क्र. 3(7) मध्ये नमूद केल्यानुसार ओळखीचा पुरावा सादर करण्यात यावा.

5. 01.01.2000 पूर्वी अस्तित्वात असलेल्या गावठाण आणि कोळीवाड्यांच्या बांधकामांसाठी प्रचलित पाणी शुल्क नियम 1.01-2 (अ) नुसार जलजोडणीचे शुल्क आकारले जाईल आणि 01.01.2000 नंतरच्या गावठाण आणि कोळीवाड्याच्या बांधकामांसाठी/विस्तारांना मंजूर केलेल्या जलजोडणीसाठी पाण्यानुसार शुल्क नियम 1.01-2 अन्वये शुल्क आकारले जाईल.

6. जल अभियंता खाते आणि त्याचे अधिकारी बांधकामामुळे मालमत्तेचे/जीवनाचे होणारे नुकसान/त्यामुळे उद्भवणारे कोणतेही कायदेशीर खटले/विवाद, कोणत्याही कायद्याच्या न्यायालयात, कोणत्याही अपघात/अपघातासाठी जबाबदार राहणार नाहीत असे क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) अर्जदाराकडून घेण्यात येईल.

7. पाणी जोडणी दिल्यानंतर, पदनिर्देशित अधिकाऱ्याला कळवले जाईल की जलजोडणी दिली गेली आहे आणि बांधकाम निष्कासीत केल्याल्यानंतर सदर जलजोडणी खंडित केली जाईल.

8. करनिर्धारण व संकलन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

9. या धोरणानंतर, गावठाण आणि कोळीवाड्यांसाठी परिपत्रक क्रमांक HE/15/परिपत्रक दि. 06.11.2013 रद्द होईल.

10. कोणत्याही संबंधित साठवण व्यवस्थेशिवाय उभ्या नळखांब जलजोडणीसाठी कोणतीही विनंती विभागीय उप जल अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याद्वारे गुणवत्तेनुसार मंजूर केली जाईल.

**४ ड) इतर:**

कोणतीही पिण्याच्या पाण्याची जलजोडणी देण्यापूर्वी करनिर्धारण व संकलन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्राचा आग्रह धरला जाणार नाही याशिवाय विद्यमान जल धोरणातील तरतुदी इतर श्रेणींसाठी लागू राहतील.

उपरोक्त धोरण हे परिपत्रक निर्गमित दिनांकापासून अंमलात आणण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**जल अभियंता**

**अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) / (शहर) / (पूर्व उपनगरे) / (पश्चिम उपनगरे)**
**महापालिका सहआयुक्त (करनिर्धारक व संकलक)**
**उप आयुक्त (वि.अ.) / उप आयुक्त (अभियांत्रिकी) / उप आयुक्त (सुधार) / उप आयुक्त (पायाभूत सुविधा प्रकल्प) / उप आयुक्त (पर्यावरण) / उप आयुक्त (शिक्षण) / उप आयुक्त (उद्यान व सुरक्षा)**
**उप आयुक्त (परिमंडळ १ ते ७)**
**संचालक (अ.से.प्र.)**
**सहाय्यक आयुक्त विभाग**
**करनिर्धारक व संकलक**

उप करनिर्धारक व संकलक (शहर) / (पूर्व उपनगरे) / (पश्चिम उपनगरे)

उपजल अभियंता (नि. व नि.) / (शहर) / (पूर्व उपनगरे) / (पश्चिम उपनगरे) / (बांधकामे) / (भां.ख.) / (परिरक्षण) / (भां.सं.) / (प्रचालने) / (पि.पां.सं.) / (मुंबई – III अ)

कार्यकारी अभियंता जलकामे शहर (उ)/(द), पू.उप (उ)/(द), प.उप (उ)/(द)

सहाय्यक अभियंता जलकामे विभाग

नगर अभियंता / प्रमुख अभियंता (विकास नियोजन) / प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) / प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) / प्रमुख अभियंता (पर्जन्य जल वाहिन्या) / प्रमुख अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) / प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रकल्प) / प्रमुख अभियंता (मुंबई मलनिःसारण प्रकल्प) / प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) / प्रमुख अभियंता (पूल) / प्रमुख अभियंता (किनारा रस्ता प्रकल्प) / प्रमुख अभियंता (मलनिःसारण प्रचालन) / प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) / प्रमुख अभियंता (ना.प्र.व सं.कें) / महानगरपालिका वास्तूशास्त्रज्ञ / सहाय्यक आयुक्त (नियोजन) / सहाय्यक आयुक्त (मंडई) / सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) / उप प्रमुख अभियंता (इमारत बांधकाम) पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, शहर / उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, शहर, वि.क. / उप प्रमुख अभियंता (आ.पा.क.) / उप प्रमुख अभियंता (शा.पा.क.) / उद्यान अधिक्षक / किटकनाशक अधिकारी